# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र-०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/ सा.प्र. /323/२०२४-२५ दि. 18/02/२०२५

**आदेश**

**बुधवार दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज** यांच्या जयंतीनिमित्त घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पुतळयास सकाळी ८.१५ वाजता पुष्पहार अर्पण करुन सकाळी ८.३० वाजता **घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा ते घोडबंदर किल्ला येथे महानगरपालिकेचे अधिकारी/ कर्मचारी, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व नागरीक यांच्या उपस्थितीत "जय शिवाजी जय भारत" पदयात्रा आयोजित करण्यात आलेले आहे.** तदनंतर एम.टी.एन.एल. समोर भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयास व मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयासमोर प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळयांस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम **मा.श्री.अनिलकुमार पवार (भा.प्र.से) आयुक्त तथा प्रशासक** यांच्या शुभहस्ते आयोजित केला आहे व मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे .

तरी सदर कार्यक्रमांकरीता खालील अधिकारी/ कर्मचारी यांनी निर्देशानुसार नेमुन दिलेल्या ठिकाणी उपस्थित राहुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती कार्यक्रमांचे कामकाज सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र | अधिकारी/ कर्मचारी | कामाचे स्वरूप |
|---|---|---|
| १. | श्री. दिपक खांबीत<br>शहर अभियंता (स्थापत्य.)<br><br>श्री. यतिन जाधव<br>उप.अभियंता. | • छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त मुख्य कार्यालयाच्या इमारतीस रोषणाई करण्याची व्यवस्था, प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयाची रंगरंगोटी करुन परिसरात सुशोभिकरण करणे.<br>• काशिमिरा व घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा व एम.टी.एन.एल. समोर भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा तसेच मुख्य कार्यालय येथील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयांजवळ रोषणाई ,सजावट व सुशोभिकरण करण्यात यावी.<br>• घोडबंदर किल्लांची रोषणाई ,सजावट व सुशोभिकरण करण्यात यावे.<br>• काशिमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाजवळ |

| | | |
|---|---|---|
| | | एल ई डी स्क्रीनची व्यवस्था करावी.<br>• घोडबंदर रोड येथील शिवाजी महाराजांचा पुतळा व घोडबंदर किल्ला येथील कार्यक्रमाच्या ठिकाणी राज्यगीताचे वादन व इतर कार्यक्रमाकरीता साउंड सिस्टमची व्यवस्था करावी.<br>• पदयात्रेतील रत्यावरील मोठे खड्डे भरणे व गटारावरील झाकणे बसविणे. |
| २. | श्री. प्रकाश बोराडे<br>प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी<br><br>श्री. अल्पेश संखे<br>सहाय्यक अग्निशमन अधिकारी | • काशिमिरा व घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पूर्णाकृती पुतळे आपल्या विभागामार्फत स्वच्छ धुवून घेण्यात यावेत. तसेच सदरचा परिसरही धुवून घेण्यात यावा.<br>• अग्निशमन विभागाची हायड्रोलीक शीडी त्यांच्या चालकासह नमुद ठिकाणी न चुकता तयार ठेवावी. याबाबत संबंधित विभागाच्या अधिनस्त अधिका-यांना आदेश देवून कार्यवाही करावी. नियोजित कार्यक्रमामध्ये बाधा येणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. |
| ३. | श्री. हंसराज मेश्राम<br>प्र.उपमुख्य उदयान अधिक्षक, भाईंदर (प.) | • एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळा आणि आणि मुख्य कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्धकृती पुतळे धुवून साफ करावेत. तसेच आजू बाजूच्या परिसरात साफ सफाई करावी.<br>• एम.टी.एन.एल. समोर भाईंदर (प.) येथे सकाळी कार्यक्रमाच्या वेळी दोन मोठे पुष्पहार, दोन श्रीफळ व फुलांची व्यवस्था करावी. याबाबत हलगर्जीपणा होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. |
| ४. | श्रीम. कांचन गायकवाड<br>सहा. आयुक्त, उद्यान<br>श्री. शामराव ईंगोले<br>लिपिक | • घोडबंदर रोड येथील अश्वारुढ पूर्णाकृती पुतळ्या करीता सकाळी कार्यक्रमावेळी तीन मोठे पुष्पहार, तीन श्रीफळ घेऊन न चुकता उपस्थित रहावे. याबाबत हलगर्जीपणा होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. |
| ५. | श्री. विजय वाकडे<br>प्र. प्रशासकीय अधिकारी<br><br>श्रीम. जुलेखा शेंदुर्ले<br>शिक्षण विभाग | • काशिगाव व घोडबंदर शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांच्याशी समन्वय साधुन "जय शिवाजी जय भारत" पदयात्रेकरीता वेळेत उपस्थित राहनेकरीता संबधित शाळेस आदेशित करावे.<br>• पदयात्रेकरीता ढोल ताशा, तुतारीचे नियोजन करणे.<br>• राज्यगीत गायन व छोटेखानी सांस्कृतिक समारंभाचे आयोजन करणेकरिता काशिगाव येथील शाळेतील विद्यार्थी |

| | | |
|---|---|---|
| | | तसेच घोडबंदर येथील राजे शिवाजी शाळेतील विद्यार्थी (५) यांना छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभुषा व विद्यार्थीनींना (५) भारतमाता यांची वेशभुषा करुन सदर कार्यक्रमा करीता शिक्षक व विद्यार्थी यांनी वरील नमुद ठिकाणी उपस्थित रहाणेकरीता शाळेस आदेशित करावे.<br>• शिक्षक वृद व आपल्या अधिनस्त असलेल्या शिक्षण विभागातील कर्मचारी यांस संबधित कामाचे वाटप करून आदेशित करावे.<br>• मिरा भाईंदर क्षेत्रातील जेष्ठ नागरीकांना निमंत्रीत करण्यात यावे.<br>• महापालिका कर्मचारी यांना वेशभुषा करुन पोवाडा गायन करणे करीता निर्देशित करावे.<br>• कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व कलाकारांना मार्गदर्शन करणे.<br>• सदर ठिकाणी रांगोळीची व्यवस्था करण्यात यावी.<br>• शाल व फेटे सह तबक तयार करणेकामी महिला शिक्षकांची नेमणुक करणे. |
| ६. | श्री. राजकुमार घरत<br>सिस्टीम मॅनेजर<br><br>श्री. जितेंद्र कांबळे,<br>जनसंपर्क अधिकारी | • फोटोग्राफी व ड्रोन व्हिडीओ शुटिंग करणेकरीता फोटोग्राफर उपलब्ध करणे व सदर कार्यक्रमाचे परिपत्रक मा. संपादक, पत्रकार,इ ना वाटप करण्याचे काम आपल्या विभागाकडून करण्यात यावे.<br>• छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे व कार्यक्रमाचे परिपत्रक महानगरपालिकेच्या वेबसाईट, सोशल मिडीया तसेच नोटीस बोर्डावर व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देणे. |
| ७. | श्री. सुनिल यादव,<br>सहा. आयुक्त,<br>सामान्य प्रशासन विभाग/भांडार विभाग/आस्थापना विभाग<br><br>श्री. सतिश भरसट<br>लिपिक ,भांडार विभाग<br><br>श्री. मयुर पाटील<br>लिपिक, आस्थापना विभाग | • कार्यक्रमाच्या आवश्यक त्या ठिकाणी शाल, श्रीफळ, फेटे, बिस्कीट, पाण्याच्या बॉटल व्यवस्था करणे.<br>• सेल्फि पॉईंट उभारणे, बॅनर, आवश्यकतेनुसार भगवे झेंडेची छपाई करून व्यवस्था करण्यात यावी.<br>• सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा रक्षक कर्मचारी यांना उपस्थित राहणे करीता आदेशित करावे.<br>• कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांना प्रमाणपत्र देणे करीता प्रमाणपत्रांची छपाई करणे.<br>• सुरक्षतेच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्था राखणेकरीता पोलिस बंदोबस्त मिळणेकरीता मा.पोलिस आयुक्त ,संबंधित परिसरातील पोलिस स्टेशन व ट्रॉफिक नियंत्रणाकरीता संबधित पोलिस अधिकारी यांना पत्रव्यवहार करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | • पदयात्रा दरम्यान विद्यार्थ्यांना पाणी-बिस्कीट वाटप करण्याची व्यवस्था करण्यात यावी. |
| ८. | श्री. जितेंद्र कांबळे<br>वाहन विभाग / सामान्य प्रशासन विभाग | • मिरा भाईंदर शहरातील उत्कृष्ठ सेवा बजावलेल्या माजी सैनिक व जेष्ठ व प्रतिष्ठीत नागरीक यांना कार्यक्रम ठिकाणे पोहचविणेकरीता वाहनाची व्यवस्था करणे. |
| ९. | श्री.प्रभाकर म्हात्रे<br>लेखापरिक्षक अधिकारी | • मिरा भाईंदर शहरातील उत्कृष्ठ सेवा बजावलेल्या माजी सैनिक व जेष्ठ वृध नागरीक यांना कार्यक्रमासाठी निमंत्रित करणे.<br>• सदर माजी सैनिक व जेष्ठ वृध नागरीक यांना कार्यक्रमा ठिकाणी ने-आण करनेकरीता आपल्या स्तरावर कर्मचारी यांची नेमणुक करावी. व वाहन विभागाशी समन्वय साधुन कामकाज करावे. |
| १०. | श्रीम. चारुशिला खरपडे<br>महिला व बालकल्याण विभाग | • घोडबंदर किल्ला येथे बचत गटाच्या महिलांचा (फराळ सखी) यांचे स्टॉल लावणे बाबत निर्देशित करणे.<br>• महिला बचत गटाच्या महिलांना सदर कार्यक्रमास उपस्थित रहाणेकरीता निर्देशित करणे. |
| ११. | श्री. स्वप्निल सावंत<br>परिवहन विभाग | • शाळेतील ५०० विद्यार्थ्यांना त्यांची शाळेपासुन ते घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा ते घोडबंदर किल्ला येथे जाण्याकरीता मनच्या परिवहन बसेस ची व्यवस्था करण्यात यावी.<br>• सदर करीता शिक्षण अधिकारी व शिक्षण विभागातील कर्मचारी यांच्याशी समन्वय साधुन बसेस पुरवठा करण्यात यावा. |
| १२. | श्री. योगेश गुणिजन<br>घनकचरा व्यवस्थापन विभाग<br><br>श्री. सुधाकर लेंडवे<br>प्रभाग अधिकारी क्र. ४<br><br>श्रीम. कांचन गायकवाड<br>प्रभाग अधिकारी क्र. ६ | • "जय शिवाजी जय भारत" पदयात्रा मार्गातील विविध प्रकारचे पुतळे धुवुन स्वच्छ करण्यात यावेत. मंदिराच्या परिसरात स्वच्छता व साफसफाई ठेवण्यात यावी. याकरीता संबधित स्वच्छता निरिक्षक व अधिनस्त कर्मचारी यांची नेमणुक करण्यात यावी.<br>• घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा व घोडबंदर किल्ला येथे कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवणेकरीता आपल्या अधिनस्त स्वच्छता अधिकारी व कर्मचारी यांची नेमणुक करावी व नियंत्रण करण्यात यावे. साफसफाई व स्वच्छता राहील याची दक्षता घ्यावी.<br>• मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय प्रांगणात व |

| | | |
|---|---|---|
| | | परिसरातील स्वच्छता करण्यात यावी.<br>• पदयात्रा परिसरातील डेब्रिज, अडगळ उचलुन घेणे. |
| १३. | श्री. यतिन जाधव<br>उप. अभियंता<br><br>श्री. प्रशांत जानकर<br>कनिष्ठ अभियंता. | • महाराजांच्या स्मारका जवळ छोटा स्टेज, घोडबंदर किल्ला येथे स्टॉल व स्टेज व्यवस्था, लाईट, साऊंड सिस्टीम , स्पिकर्स व २ माईक यांची आवश्यतेप्रमाणे व्यवस्था करण्यात यावी.<br>• कार्यक्रमासाठी टेबल व खुर्च्यांची व्यवस्था करण्यात यावी. |
| १४. | डॉ. प्रमोद पडवळ<br>वैद्यकीय अधिकारी | • पदयात्रा ठिकाणी एक डॉ. व परिचारिकेसह रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात यावी. |
| १५. | श्री. नरेंद्र चव्हाण<br>सहा. आयुक्त, अतिक्रमण निर्मुलन<br><br>श्री. सुधाकर लेंडवे<br>प्रभाग अधिकारी क्र. ४<br><br>श्रीम. कांचन गायकवाड<br>प्रभाग अधिकारी क्र. ६ | • कार्यक्रमाच्या ठिकाणी असलेली बेवारस वाहने व पदयात्रेत बाधा होईल अशा फेरीवाल्यांना हटविणे. |

वरील प्रमाणे नमुद आदेशातील कामे संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्याने वेळेत पुर्ण करून सदर आदेशाचे तंतोतंत पालन करावे . सोपविलेले कामकाजांची जबाबदारी पार पाडावी याची दक्षता घ्यावी.

**(सचिन बांगर)**
**अतिरिक्त आयुक्त (सा.प्र.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत कार्यवाहीस्तव**

१) संबधित अधिकारी/ कर्मचारी, मि.भा.मनपा
२) सामान्य प्रशासन निवडनस्ती

**प्रत माहितीस्तव**

१) मा.आयुक्त तथा प्रशासक, मि.भा.मनपा
२) अतिरिक्त आयुक्त- (कर), मि.भा.मनपा
३) उपायुक्त (मु.), मि.भा.मनपा